मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीचा 'डिजिटल' कारभार संकटात

## कोट्यवधी खर्चानंतरही कॅमेरे आणि ऑनलाइन प्रणाली निष्क्रिय; नगरसेवकांचा संताप, ठेकेदारांवर कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीने शहरभरात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे कालबाह्य झाले आहेत. त्यामुळे ते आता वापरण्यायोग्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्या ठिकाणी नव्याने कॅमेरे लावावे लागणार आहेत. तो कोट्यवधीचा खर्च महापालिका प्रशासनाला करावा लागणार आहे.

स्मार्ट सिटी कंपनीने शहरभरात सुमारे नऊ हजार सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. त्या कॅमेऱ्याची पाच वर्षांची गॅरंटी देण्यात आली होती. ते कॅमेरे लावून आठ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाल्याने ते आता व्यवस्थित चालत नाहीत. अनेक कॅमेरे बंद तसेच, नादुरुस्त आहेत. कॅमेऱ्यासाठी लावलेल्या बॅटऱ्या चोरीला गेल्या आहेत. त्यामुळे स्मार्ट सिटीने केलेला कोट्यवधीचा खर्च वाया गेला आहे. शहरातील अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद असून, ते तातडीने सुरू करावेत, असे पत्र पिंपरी-चिंचवड पोलिसांनी महापालिकेस दिले आहे. मात्र, त्यावर तातडीने कार्यवाही होत नसल्याने महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी संताप व्यक्त केला.



कोट्यवधी रुपये खर्च करून लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे कालबाह्य झाल्याने आता उपयोगाचे राहिले नसल्याने नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील कॅमेरे हे केवळ शोभेचे आहेत. त्याचा पोलिस यंत्रणेला काही फायदा होत नाही, असा आरोप नगरसेवक योगेश बहल व प्रमोद कुटे यांनी केला.

त्याबाबत स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांना समाधानकारक खुलासा करता आला नाही. सीसीटीव्ही कॅमेऱ्याची मुदत पाच वर्षे असून, त्यापुढे पाच वर्षे संबंधित टेक महिंद्रा या ठेकेदार कंपनीकडून देखभाल व दुरूस्ती करण्यात येणार आहे, असा दावा त्यांनी केला.

त्याबाबत स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांना समाधानकारक खुलासा करता आला नाही. सीसीटीव्ही कॅमेऱ्याची मुदत पाच वर्षे असून, त्यापुढे पाच वर्षे संबंधित टेक महिंद्रा या ठेकेदार कंपनीकडून देखभाल व दुरूस्ती करण्यात येणार आहे, असा दावा त्यांनी केला.

### पाच हजार कॅमेरे बंद

» पिंपरी-चिंचवड महापालिका आणि स्मार्ट सिटी कंपनीच्या वतीने संपूर्ण शहरात एकूण ८ हजार ७९० सीसीटीव्ही कॅमेरे बसविऱ्यात आले आहेत. ते सर्व कॅमेरे नियंत्रण प्रणालीशी जोडण्यात आले. त्यापैकी केवळ ३ हजार ८२७ कॅमेरे सुरू आहेत. त्यांचे थेट प्रेक्षपण कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटरमधून पाहता येते. तर, तब्बल ४ हजार ९६३ कॅमेरे बंद आहेत. देखभाल, दुरुस्ती व तांत्रिक कारणांमुळे ते कॅमेरे बंद असल्याचा स्मार्ट सिटी कंपनीकडून सांगितले जात आहे.

स्मार्ट सिटी कंपनीकडून डीएमएस ई-ऑफिस प्रणाली सुरू करण्यात आली आहे. महापालिकेच्या सर्व विभागांचे दैनंदिन कामकाज ई-ऑफिस प्रणालीत केले जाते. महापालिकेचे सर्व विभागाचे कामकाज ऑनलाईन सुरू आहे. त्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी, प्रशासन अधिकारी, शाखाप्रमुख, लिपिक यांना प्रशासकीय कामकाजासाठी डिजिटल कोड देण्यात आला आहे. त्यासाठी स्मार्ट सिटीने तब्बल ११२ कोटी रुपये खर्च केले आहेत. असे असूनही, ती प्रणाली वारंवार बंद पडत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असून, महसूल बुडत आहे. संबंधित ठेकेदाराला केवळ नोटिसा दिल्या जात असून, ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. झालेले नुकसान व खर्च स्मार्ट सिटीचे संबंधित अधिकारी व ठेकेदार तसेच, सल्लागारांकडून वसूल करावा. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून, कठोर कारवाई करावी, असे सामाजिक कार्यकर्त मारुती भापकर यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये मेट्रोला पर्याय? बीआरटी मार्गावर धावणार ई-आरटीएस इलेक्ट्रिक बस

## मोशी ते वाकड 17 किमी मार्गावर पहिला टप्पा; पीएमपीएलपेक्षा महाग पण मेट्रोपेक्षा स्वस्त तिकीट, एका बसमधून 240 प्रवाशांची क्षमता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने बीआरटीएस मार्गावर परदेशाप्रमाणे इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिस्ट सिस्टिम (ई-आरटीएस) अर्थात ईलेक्ट्रिक बससेवा सुरू करण्यात येणार आहे. पीएमपीएल बसपेक्षा थोडे अधिक आणि मेट्रोपेक्षा कमी असे त्याचे तिकीटदर असणार आहे. त्या बसेस बीआरटीच्या सर्व थांब्यांवर थांबणार असून, त्यांच्या फेऱ्याची वारंवारता अधिक असणार आहे. हा राज्यातील पहिलाच प्रकल्प असून, नागरिकांना मेट्रोप्रमाणे दर्जेदार व वेगवान सेवा मिळेल, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र, पुण्यातील बीआरटीप्रमाणे या नव्या संकल्पनेची अवस्था होऊ नये, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून व्यक्त केली जात आहे



शहरात वेगवेगळ्या पाच रस्त्यांवर एकूण ६० किलोमीटर अंतराचा बीआरटी मार्ग आहे. मात्र, पीएमपीएलकडून आवश्यकतेनुसार बस पुरवल्या जात नसल्याने, फेऱ्यांची संख्या अपुरी असल्याने प्रवाशांनी बीआरटीकडे पाठ फिरवली आहे. परिणामी, तब्बल ६०० कोटी रुपयांचा खर्च पाण्यात गेल्याचा आरोप महापालिका व पीएमपीएलवर केला जात आहे. त्याला पर्याय म्हणून प्रगत देशात मोठा प्रतिसाद असलेली आणि कमी खर्चाची ई- आरटीएस ही नवीन प्रवासी वाहतूक व्यवस्था समोर आली आहे. त्यासाठी मेट्रोच्या तुलनेत खूपच कमी खर्च असून, पहिल्या टप्प्यात मोशी ते वाकड अशी १७ किलोमीटर धावणार आहे.

पीएमपीएलच्या धर्तीवर खासगी कंपनी नेमण्यात येणार आहे. त्याचा डीपीआर महामेट्रो तीन महिन्यांत बनवणार आहे. प्रकल्पास राज्य व केंद्र शासनाची मान्यता घेण्यात येईल. हिरवा कंदील मिळाल्यानंतर त्याची निविदा प्रसिद्ध करून देश-विदेशातील कंपन्यांकडून दर प्रस्ताव मागवण्यात येणार आहे. महापालिकेकडून पात्र कंपनीस मान्यता दिल्यानंतर प्रथम दीड ते दोन वर्षांसाठी करारनामा केला जाईल. नागरिकांचा प्रतिसाद लक्षात घेऊन मुदतवाढ देऊन, इतर बीआरटी मार्गावरही तो प्रकल्प राबवण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पावसाचा कहर; रस्ते जलमय, वाहतूक ठप्प

## 24 तासांत 28.5 मिमी पावसाची नोंद; सखल भागात पाणी साचले, पीएमपी सेवा विस्कळीत, पूरस्थितीसाठी महापालिका यंत्रणा सज्ज





**पिंपरी | प्रतिनिधी**

साईचौक येथील लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप भाजी मार्केट मध्ये आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनात साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रथमेश लोकनेते लक्ष्मण भाऊ जगताप भाजी मार्केटचे अध्यक्ष संजय मराठे यांच्या हस्ते पुष्पहार घालून पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला.

लोकनेते आमदार लक्ष्मण भाऊ जगताप भाजी मार्केट मध्ये येथील भाजी विक्रेते व सामाजिक कार्यकर्ते एकत्र येऊन सर्व महापुरुषांच्या जयंती दरवर्षी साजरा करीत असतात. समाजोपयोगी व समाज प्रबोधनात्मक काम करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तींचे मान सन्मान यावेळी करण्यात येत असतात.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य,शाहिरी आणि सामाजिक विचारांतून वंचित,शोषित आणि कष्टकरी समाजाला आवाज दिला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी आपल्या ओजस्वी शाहिरीतून जनजागृती करत महाराष्ट्राच्या अस्मितेला बळ दिले.त्यांचे समता,स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजातील प्रत्येक घटकाच्या सन्मानासाठी आणि सर्वसमावेशक विकासासाठी कार्य करणे,हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे त्या प्रसंगी अध्यक्ष संजय मराठे म्हणाले.

याप्रसंगी कुणाल धिवार,रमेश डफळ,संदीप पाटील,नितीन कुचेकर,गणेश मते,तौफिक सय्यद,प्रवीण भोसले,जगदीश बच्छाव,अंकुश आपेट,भरत प्रसात,खंडेराव हल्लाले,सयाजी आगलावे,गणेश पैठणी,नितीन दोधाड,वैभव काळे,अरुण जाधव,बपीराम भोंगे,मनोज शिंदे,नवीन खान,एजास शहा,किरण वाणी,विपुल शिंदे,अंजना शिंदे,नंदा जाधव आदी भाजी विक्रेते,मान्यवर व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्रात पहिल्यांदाच झालेल्या 'साहित्यरत्न दौड मध्ये' हजारो पिंपरी चिंचवडकर एकत्र धावले..!

## आमदार सुनील शेळके यांनी सहभाग घेत तळेगावच्या भविष्यातील शाश्वत, नागरिककेंद्रित आणि सर्वसमावेशक विकासाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.




**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यान चौकात अत्यंत दणक्यात, उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात 'साहित्यरत्न दौड २०२६' पार पडली. उल्लेखनीय म्हणजे साहित्यरत्न दौडमध्ये नागरिक, युवक आणि क्रीडाप्रेमींनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला असून २२०० हून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आमदार अमित गोरखे साहेब यांचे विशेष अभिनंदन केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे पिंपरी-चिंचवड प्रबोधन पर्व २०२६' या साप्ताहिकाअंतर्गत हा भव्य उपक्रम राबवण्यात आला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन, आर्टी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि कलारंग यांच्या संयुक्त सहकार्याने या आगळ्यावेगळ्या दौडचे आयोजन करण्यात आले होते. आमदार अमित गोरखे यांच्या कुशल नेतृत्वाखाली पार पडलेल्या या दौडमध्ये अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत... तसेच पिंपरी-चिंचवडसह विविध शहरांतून आलेल्या हजारो नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. नागरिकांच्या अफाट उपस्थितीने बर्ड व्हॅली उद्यान परिसर अक्षरशः दुमदुमून गेला होता.

### 'साहित्यरत्न दौड – रन फॉर हेल्थ'

» यावेळी मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आमदार अमित गोरखे साहेब यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच आमदार गोरखे अत्यंत नाविन्यपूर्ण संकल्पनेतून, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्यांदाच 'साहित्यरत्न दौड' चे आयोजन केल्याचे त्यांनी म्हटले. सहसा महापुरुषांच्या जयंतीनिमित्त आपण बोधपर्व किंवा विविध मिरवणुका काढतो. परंतु, शहर सुदृढ राहावे आणि नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे, या उदात्त उद्देशाने आमदार साहेबांनी ही 'साहित्यरत्न दौड – रन फॉर हेल्थ' सुरू केली; ही खरोखरच एक अतिशय स्तुत्य आहे. त्याबद्दल आमदार अमित गोरखे साहेबांचे मी विशेष अभिनंदन करतो. आजच्या या 'रन फॉर हेल्थ' उपक्रमात २,२०० हून अधिक नागरिकांनी अतिशय चांगल्या क्रीडा भावनेने (Spirit) उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे मी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि शासनाच्या विविध उपक्रमांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला आहे. या कार्यक्रमाला सहाय्य केल्याबद्दल पोलीस प्रशासन, महानगरपालिकेचे कर्मचारी आणि सर्व सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. महाराष्ट्रात प्रथमच राबवलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमासाठी सर्वांना खूप खूप शुभेच्छा, या शब्दांत डॉ. सूर्यवंशी यांनी भावना व्यक्त

**"लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार हे केवळ एका पिढीपुरते मर्यादित नसून ते संपूर्ण बहुजन समाजासाठी आणि युवाशक्तीसाठी सदैव मार्गदर्शक आहेत. आजच्या या 'साहित्यरत्न दौड २०२६' मध्ये पिंपरी-चिंचवडच्या लाडक्या नागरिकांनी आणि युवकांनी ज्या अभूतपूर्व उत्साहात सहभाग घेतला, त्यावरून हे स्पष्ट होते की अण्णा भाऊंचे विचार आजही प्रत्येकाच्या मनात आणि रक्तात रुजलेले आहेत. युवकांना सकारात्मक ऊर्जा, उत्तम आरोग्य आणि सामाजिक समरसतेचा संदेश देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, यापुढेही अशाच प्रेरणादायी उपक्रमांच्या माध्यमातून आपण अण्णाभाऊंचा वैचारिक वारसा पुढे नेत राहू."**

**- अमित गोरखे, आमदार**

# पुण्यासाठी 25 टीएमसी पाणी द्या! महापौर मंजुषा नागपुरे यांची जलसंपदामंत्र्यांकडे मागणी

## भविष्यातील गरजांसाठी 25 टीएमसी पाणी कोटा मंजूर करण्याचे आवाहन; मुंबईतील बैठकीत जलसंपदामंत्र्यांचे सकारात्मक संकेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराच्या भविष्यातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन शहरासाठी २५ टीएमसी पाणी कोटा मंजूर करावा, तसेच खडकवासला धरणसाखळीतील गाळ काढून जलसाठा क्षमता वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी आग्रही मागणी महापौर मंजुषा नागपुरे यांनी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली. महापौरांनी मुंबई येथे ही भेट घेत मागणी केली.

या बैठकीत धायरी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित दोन पुलांच्या बांधकामास जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) तातडीने मंजूर करण्याची मागणी महापौरांनी केली. याशिवाय मुळा-मुठा नदीच्या संवर्धनासाठी राज्यस्तरीय 'मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन मिशन' स्थापन करून नदीतील गाळ काढणे,

प्रदूषण नियंत्रण आणि पूर व्यवस्थापनासाठी एकात्मिक आराखडा राबवण्याची सूचना त्यांनी केली. खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चारही धरणांतील गाळ काढून जलसाठा क्षमता पूर्ववत करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी आणि त्यासाठी संयुक्त उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी मागणीही त्यांनी या वेळी केली.

धायरी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित दोन पुलांच्या बांधकामास जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) तातडीने मंजूर करण्याची मागणी महापौरांनी केली. तसेच मुळा-मुठा नदीच्या संवर्धनासाठी राज्यस्तरीय 'मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन मिशन' स्थापन करून नदीतील गाळ काढणे, प्रदूषण नियंत्रण आणि पूर व्यवस्थापनासाठी एकात्मिक आराखडा राबविण्याचा प्रस्ताव मांडला. खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांतील गाळ काढण्यासाठी संयुक्त उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचीही मागणी करण्यात आली.




### पुण्यासाठी 25 टीएमसी पाणी कोट्याची मागणी

» पुणे शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन शहरासाठी २५ टीएमसी पाणी कोटा मंजूर करण्याची मागणी महापौर मंजुषा नागपुरे यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली. मुंबई येथे झालेल्या बैठकीत खडकवासला धरणसाखळीतील गाळ काढून जलसाठा क्षमता वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचाही आग्रह धरण्यात आला. धरणांतील गाळामुळे साठवण क्षमता कमी होत असल्याने भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज महापौरांनी अधोरेखित केली.

### धायरी पुलांसह नदी पुनरुज्जीवनावर भर

» धायरी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित दोन पुलांच्या बांधकामास जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) तातडीने मंजूर करण्याची मागणी महापौरांनी केली. तसेच मुळा-मुठा नदीच्या संवर्धनासाठी राज्यस्तरीय 'मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन मिशन' स्थापन करून नदीतील गाळ काढणे, प्रदूषण नियंत्रण आणि पूर व्यवस्थापनासाठी एकात्मिक आराखडा राबविण्याचा प्रस्ताव मांडला. खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांतील गाळ काढण्यासाठी संयुक्त उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचीही मागणी करण्यात आली.

"पवना नदीचे प्रदूषण ही आपल्या सर्वांसाठी चिंतेची बाब आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शहराचा पर्यावरण समतोल राखण्यासाठी कटिबद्ध आहोत. नदीपात्रात कचरा टाकणाऱ्यांवर आणि बेकायदेशीरपणे सांडपाणी सोडणाऱ्यांवर आता केवळ दंड करून थांबणार नाही, तर त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश मी प्रशासनाला दिले आहेत. प्रशासनाकडून नदीपात्र स्वच्छतेची विशेष मोहीम तातडीने राबवण्यात येईल."

- मंजूषा नागपुरे (महापौर)

# राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी ' जेन झी ' ला सुनावले ! म्हणाले मनात येईल...

## नव्या स्वच्छता व्यवस्थेत 9 हजार 523 कर्मचारी रस्त्यावर; काम न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना घेण्यास ठेकेदारांचा विरोध

**पुणे | प्रतिनिधी**

'स्वातंत्र्य म्हणजे केवळ स्वत:च्या इच्छेने किंवा मनात येईल ते करणे नव्हे,' अशा शब्दांत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी तरुणांचे कान टोचले. लोकमान्य टिळक ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. त्या वेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनाचे पडसाद अजूनही उमटत आहेत. आंदोलन करताना तरुणाईने वापरलेली भाषा, त्यावर समाजमाध्यमांवर केले जाणारे मिम्स यावर विविध स्तरातून टीका होत आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आलेल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी देखील सत्काराला उत्तर देताना त्यावर भाष्य केले.

डोभाल म्हणाले, 'लोकमान्य टिळकांचे विचार आजही तितकेच प्रासंगिक आहेत. त्यांची राष्ट्र उभारणीची परिकल्पना काय होती, याचा आजच्या तरुण पिढीने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आजच्या तरुण पिढीला कदाचित असे वाटत असेल, की भारत नेहमीपासूनच आजच्यासारखा होता. आपल्याला मिळालेले बोलण्याचे स्वातंत्र्य, एवढाच स्वातंत्र्याचा अर्थ नाही'.

'स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लोकमान्य टिळकांसह इतर देशभक्तांनी दिलेल्या लढ्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यासाठी संघर्षाचा कठीण मार्ग स्वीकारून अन्यायाचा प्रतिकार करायचा आणि त्या संघर्षात विजय मिळवायचा, हे सांगून लोकमान्यांनी देशातील तरुण आणि सर्वसामान्य जनतेमध्ये नवे चैतन्य, आत्मविश्वास आणि पुरुषार्थ जागविला, हे तरुण पिढीने विसरता कामा नये.'



### अजित डोभाल यांचा तरुणांना संदेश

» राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी स्वातंत्र्याचा अर्थ केवळ मनाला वाटेल ते करणे किंवा अमर्याद अभिव्यक्ती नसून त्यासोबत जबाबदारीही तितकीच महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारताना त्यांनी तरुणांनी लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रनिर्माणाच्या विचारांचा अभ्यास करण्याचे आवाहन केले. स्वातंत्र्यासाठी देशभक्तांनी केलेल्या संघर्षाचे स्मरण ठेवून अधिकारांचा जबाबदारीने वापर करावा, असे ते म्हणाले. भारताच्या प्रगतीमुळे काही शक्तींना अस्वस्थता वाटत असल्याने देशाच्या हितासाठी सजग, जबाबदार आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणारी भूमिका तरुणांनी स्वीकारावी, असेही त्यांनी सांगितले.

# ताम्हिणी घाट 25 दिवसांपासून बंद; पर्यटन ठप्प

## अतिवृष्टीमुळे रस्ता वाहून गेला; पळसे धबधबा परिसरातील व्यावसायिकांचे 2 कोटींहून अधिक नुकसान

**पुणे | प्रतिनिधी**

पश्चिम महाराष्ट्रात गेल्या ४ आठवड्यांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे पुणे ते ताम्हिणी घाट हा मुख्य रस्ता २५ दिवसांपासून पूर्णतः बंद आहे. डोंगरवाडी ते निवेदरम्यान रस्ता वाहून गेल्याने प्रशासनाने पर्यटकांच्या सुरक्षेसाठी घाटात प्रवेशबंदी केली आहे. याचा थेट फटका मुळशीतील पळसे धबधबा परिसरातील छोटे व्यावसायिक, हॉटेल, ढाबा आणि भुट्टा विक्रेत्यांना बसला आहे.

पळसे येथे रस्त्यालगत आकर्षक असा धबधबा आहे. पर्यटकाचे आवडते ठिकाण पळसे धबधबा असून, हा धबधबा पाहण्यासाठी तसेच पाण्यात चिंब भिजण्यासाठी पर्यटक पुणे आणि पिंपरी-चिंचवडहून येथे येतात.

मात्र पळसे धबधब्याजवळ असलेल्या वळणावरच तसेच डोंगरवाडीजवळ ओढ्यावर रस्ता वाहून गेला आहे. त्यामुळे प्रशासनाने सतर्कता बाळगत गेल्या २५ दिवसांपासून हा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवल्याने याचा थेट फटका पर्यटनाला बसून व्यावसायिक आर्थिक दृष्ट्या अडचणीत सापडले आहेत.



### पर्यटन ठप्प; छोट्या व्यावसायिकांचे मोठे नुकसान

» पावसाळा हा मुळशी आणि ताम्हिणी परिसरासाठी सर्वाधिक उत्पन्नाचा हंगाम मानला जातो. मात्र रस्ता बंद असल्याने पळसे धबधबा परिसरातील ३० हून अधिक चहा-नाश्त्याच्या टपऱ्या, भुट्टा विक्रेते, पार्किंग स्टॉल आणि लहान दुकाने बंद पडली आहेत. गेल्या २५ दिवसांत पर्यटक न आल्याने या व्यावसायिकांचे उत्पन्न पूर्णपणे ठप्प झाले आहे. अनेकांनी हंगामासाठी केलेली गुंतवणूकही अडकली असून आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे.

पावसाळा म्हणजे मुळशी आणि ताम्हिणी परिसरासाठी 'गोल्डन सीझन'. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडमधून दररोज हजारो पर्यटक मुळशी धरण, पळसे, भिरा, ताम्हिणी येथे धबधबे पाहायला येतात. परंतु, यंदा रस्ता बंद असल्याने गेल्या २५ दिवसांपासून पर्यटक या भागात आलेले नाहीत. यामुळे पळसे गावाजवळील धबधब्याच्या प्रवेशद्वाराजवळ असलेली ३० हून अधिक छोटी दुकाने, चहा-नाष्ट्याच्या टपऱ्या, भुट्टा भाजण्याचे गाडे आणि पार्किंगचे स्टॉल सध्या पूर्णपणे बंद आहेत.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते शेडाणी फाटा, मुळशी, पळसे आणि ताम्हिणी घाट परिसरातील २०० ते २५० कुटुंबांचा रोजगार थेट पर्यटनावर अवलंबून आहे. मागील २५ दिवसांत सुमारे २ कोटी रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या माहितीनुसार, शेडाणी फाटा, मुळशी, पळसे आणि ताम्हिणी घाट परिसरातील सुमारे २०० ते २५० कुटुंबांचा उदरनिर्वाह पर्यटनावर अवलंबून आहे. रस्ता बंद असल्याने हॉटेल, ढाबे, वाहनतळ, खाद्यपदार्थ विक्री आणि इतर पर्यटनाशी संबंधित व्यवसायांना मोठा फटका बसला आहे. गेल्या २५ दिवसांत दोन कोटी रुपयांहून अधिक आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. स्थानिकांनी रस्त्याची दुरुस्ती युद्धपातळीवर पूर्ण करून घाट लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे.

### 25 दिवसांपासून ताम्हिणी घाट बंद

» पश्चिम महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे पुणे–ताम्हिणी घाट हा मुख्य रस्ता गेल्या २५ दिवसांपासून वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद आहे. डोंगरवाडी ते निवेदरम्यान रस्ता वाहून गेल्याने प्रशासनाने पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी प्रवेशबंदी लागू केली आहे. घाटातील परिस्थिती अद्याप धोकादायक असल्याने दुरुस्तीचे काम सुरू असले तरी वाहतूक सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि मुंबईहून येणाऱ्या पर्यटकांचा ओघ पूर्णपणे थांबला असून मुळशी परिसरातील पर्यटन व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे.

### 250 कुटुंबांच्या रोजगारावर परिणाम

» स्थानिक ग्रामस्थांच्या माहितीनुसार, शेडाणी फाटा, मुळशी, पळसे आणि ताम्हिणी घाट परिसरातील सुमारे २०० ते २५० कुटुंबांचा उदरनिर्वाह पर्यटनावर अवलंबून आहे. रस्ता बंद असल्याने हॉटेल, ढाबे, वाहनतळ, खाद्यपदार्थ विक्री आणि इतर पर्यटनाशी संबंधित व्यवसायांना मोठा फटका बसला आहे. गेल्या २५ दिवसांत दोन कोटी रुपयांहून अधिक आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. स्थानिकांनी रस्त्याची दुरुस्ती युद्धपातळीवर पूर्ण करून घाट लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे.


# पोलिसांचे 'मिशन भाडेकरू'! भाडेकराराशिवाय राहणाऱ्यांवर धडक कारवाई; 41 घरमालकांवर कारवाई

## 21 ते 28 जुलै दरम्यान शहर पोलिसांच्या विशेष शाखेकडून मोठी मोहीम; सिटीझन पोर्टलवर माहिती न देणाऱ्या घरमालक व भाडेकरूंवर कारवाई.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात भाडेकरार केल्याशिवाय किंवा पोलिसांना पूर्वकल्पना दिल्याशिवाय भाडेतत्त्वावर राहणारे भाडेकरू आणि घर भाड्याने देणारे घरमालक यांच्याविरोधात शहर पोलिसांच्या विशेष शाखेने कठोर कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत २१ ते २८ जुलै कालावधीत ४१ घरमालक व भाडेकरूंवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ अंतर्गत कारवाई केली आहे.

ही मोहीम पुढेही तीव्रतेने सुरू ठेवण्यात येणार आहे. शहरात शिक्षण, नोकरी आणि व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर परराज्य तसेच राज्याच्या विविध भागातून आलेले नागरिक भाडेतत्त्वावर, पीजी किंवा कॉट बेसिसवर राहतात. अशा व्यक्तींपैकी अनेकजणांचा विविध गुन्ह्यांमध्ये सहभाग आढळून आल्याने भाडेकरूंची माहिती पोलिसांकडे नोंदविणे अनिवार्य केले आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, सिटीझन पोर्टलवरील भाडेकरू / पेइंग गेस्ट माहिती या सुविधेद्वारे घरमालकांनी भाडेकरूंची माहिती संबंधित पोलीस ठाण्याला ऑनलाइन देणे बंधनकारक आहे. तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३(३) नुसार घरमालक, इस्टेट एजंट आणि भाडेकरूंनी भाडेकरारासह पोलीस चारित्र्य पडताळणीची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जात आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. प्रशांत अमृतकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. विशेष शाखेच्या परिमंडळ १ ते ७ मधील अधिकारी आणि संबंधित पोलीस ठाण्यांच्या पथकांनी संयुक्तपणे भाडेतत्त्वावरील घरांची पडताळणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली.

### भाडेकरूंची माहिती देणे बंधनकारक

» शहरात घर, फ्लॅट, पीजी किंवा कॉट बेसिसवर जागा भाड्याने देताना संबंधित भाडेकरूंची माहिती पोलिसांकडे नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. सिटीझन पोर्टलवरील 'भाडेकरू/पेइंग गेस्ट माहिती' सुविधेद्वारे ही माहिती ऑनलाइन सादर करता येते. तसेच भाडेकरार आणि पोलीस चारित्र्य पडताळणीची कागदपत्रेही संबंधित पोलीस ठाण्यात जमा करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमुळे शहरात राहणाऱ्या भाडेकरूंची अधिकृत नोंद तयार होऊन गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यास पोलिसांना मदत होणार आहे.